# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट ४१६-२०२४** **दिनांक-०८/११/२०२४**

## " विधानसभा निवडणुक – २०२४ चे पार्श्वभुमीवर नयानगर पोलीस ठाण्याकडुन दोन घटनेत एकुण १,४९,७३,४८६/रु संशयित रोख रक्कम जप्तीची कारवाई "

दिनांक २०.११.२०२४ रोजी महाराष्ट्र राज्यात विधानसभा निवडणुक पार पडणार असुन त्या पार्श्वभुमीवर मा.मुख्य निवडणुक आयुक्त,म. रा. मुंबई यांचेकडुन दिनांक १५.१०.२०२४ रोजी पासुन आदर्श आचारसंहीता लागु करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुक २०२४ दरम्यान आर्थिक गैरव्यवहार रोखण्याकरीता मा.निवडणुक आयोग यांचे निर्देशानुसार तसेच मा.पोलीस आयुक्त सो,मि भा व वि यांचे आदेशांन्वये नयानगर पोलीस ठाणे हद्दीत आचारसंहीता लागु झाल्यापासुन वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येत होती.

त्या अंतर्गत दिनांक ०७.११.२०२४ रोजी सकाळी १०.०० वा पासुन १) पोहवा/०६०७८ विजय गुरव २) पोहवा/१००३१ प्रमोद केंद्रे, ३) पोअं./२३०१६ सौरभ इंगळे,४) पोअं/२३११७ बाबासाहेब पाटील, ५) पोअं/२३१२२ विकी पोवार यांना नयानगर पोलीस ठाणे अंतर्गत बॅक रोड येथे वाहन तपासणी मोहीम राबविण्याकरीता नेमण्यात आले होते.

सदर पथक कर्तव्यावर असताना दिनांक ०७.११.२०२४ रोजी दुपारी १२.०० वा चे सुमारास वाहन क्रमांक. MH02-FG 4698 यात रोख रक्कम घेवुन जात असतांना १) मंगेश गजानन कदम वय ४५ वर्ष , व्यवसाय नोकरी (कॅश मॅनेजर एच.डी.एफ.सी.बँक) २) संजय विठ्ठल शिंदे वय – ४३ वर्षे व्यवसाय - लोडर (एस ॲण्ड आय बी कंपनी, सांताक्रुझ,मुंबई) ३) सुशील काशिनाथ मोहीते वय – ४५ वर्षे, व्यवसाय - लोडर (एस ॲण्ड आय बी कंपनी, सांताक्रुझ,मुंबई) ४) लॉईड पॉल डिसोजा वय – ५३ वर्षे, व्यवसाय – चालक (एस ॲण्ड आय बी कंपनी, सांताक्रुझ,मुंबई) असे मिळुन आले असुन त्यांचे ताब्यातील वाहनात मिळुन आलेल्या एकुण २० लोखंडी ट्रंकपैकी ०३ ट्रंकमध्ये एचडीएफसी बँकेची एकुण १,०९,५०,०००/रु इतकी रोख रक्कम मिळुन आली. सदर रकमेची भरारी पथकातील (एफएसटी) १) भावेश अविनाश पाटील वय – २५ वर्षे व्यवसाय – नोकरी (लिपीक,मिराभाईंदर मनपा) यांनी आपल्या मोबाईल मध्ये असलेल्या ईएसएमएस या ॲपव्दारे स्कॅनिंग केली असता सदर वाहन किंवा त्यावर नमुद ५८,००,०००/रु रकमेचा कोणताही उल्लेख येत नव्हता. त्या कारणाने सदर रक्कमेचा व त्यासोबतच्या सर्व रक्कमेचा व पावत्यांचा निवडणुकीच्या अनुषंगाने संशय आल्याने तसेच त्याबाबत मंगेश गजानन कदम यांनी समर्पक माहीती न दिल्याने सदरची रक्कम पुढील कारवाई करीता जप्त करण्यात आली आहे.

दुस-या एका घटनेत सदर पथकास दिनांक ०७.११.२०२४ रोजी १४.०० वा चे सुमारास महीन्द्रा कंपनीची पिकअप कॅश व्हॅन क्रमांक एम एच – १२ – टिव्ही – २५६२ ही चेत रोख रक्कम घेवुन जात असताना १) अविनाश हनुमंत निंबाळकर व इतर ०३ जण मिळुन आले असुन

निवडणुकीच्या अनुषंगाने संशय आल्याने सदरची रक्कम पुढील कारवाई करीता जप्त करण्यात आली आहे.

वरील दोन्ही घटनेत जप्त केलेली **१,४९,७३,४८६/रु संशयित रोख्र रक्कम** पुढील कार्यवाहीसाठी मा कोषागार अधिकारी ठाणे यांचे कार्यालयात जमा करण्यात आली असुन सदर घटनेबाबत मा. निवडणुक अधिकारी सो, १४५,विधानसभा, मिरा भाईंदर व मा. आयुक्त सो, आयकर विभाग, ठाणे यांना सादर करण्यात आली असुन त्यांचेकडुन प्राप्त आदेशांप्रमाणे पुढील कार्यवाही करीत आहोत.

वरील कामगीरी मा. श्री. प्रकाश गायकवाड, उप आयुक्त साो. परीमंडळ – १ मिरारोड, मा. श्री विवेक मुगळीकर, सहाय्यक पोलीस आयुक्त साो. नवघर विभाग, श्री अमर जगदाळे प्रभारी पोलीस निरीक्षक नयानगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली , पोनि/राजेंद्र खेडकर तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे, १) सपोनि इरफान नदाफ २) पोहवा/०६०७८ विजय गुरव ३) पोहवा/१००३१ प्रमोद केंद्रे, ४) पोअं./२३०१६ सौरभ इंगळे,५) पोअं/२३११७ बाबासाहेब पाटील, ६) पोअं/२३१२२ विकी पोवार यांनी सदरची कामगीरी पार पाडली आहे

-------ooooo-------